Ph.D Ente. test. - Arts

AGJ 1st half (g) 40

**Con. 2979-12.**

Marathi

**KK–2459**

(3 Hours)

**[ Total Marks : 100**

28/4/12

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) **अंतर्गत** पर्याय लक्षात घ्या.
(३) **उजवीकडील** अंक गुणदर्शक आहेत.

प्रश्न १. खालील सर्व बहुपर्यायी प्रश्नांची योग्य उत्तरे तुमच्या उत्तरपत्रिकेत नोंदवा. ४०

१. ध्वनिपरिवर्तन नियमानुसारी असते हे तत्त्व सर्वप्रथम कोणी मांडले ?

अ) चॉम्स्की ब) सोस्युर क) ग्रिम ड) याकोबसन

२. खालीलपैकी कोणते अनुनासिक मूर्धन्य आहे?

अ) म् ब) न् क) ङ् ड) ण्

३. 'तद्धिते' म्हणजे काय?

अ) धातुसाधित ब) विशेष्य क) क्रियाविशेषण ड) नामसाधित

४. 'तो वेगाने धावतो' या वाक्यातील 'वेगाने' या शब्दाची जाती कोणती?

अ) सर्वनाम ब) क्रियाविशेषण क) नाम ड) केवलप्रयोगी अव्यय

५. दगड-दगड, पेरू-पेरू या उदाहरणांत अनेकवचनी शब्दाला कोणता प्रत्यय लागला आहे?

अ) विभक्तीप्रत्यय ब) आख्यातप्रत्यय क) शून्यप्रत्यय ड) शब्दसिद्धीचा प्रत्यय

६. अंतर् – बहिर् - वर्तुळ सिद्धान्ताची मांडणी कोणी केली?

अ) ग्रिअर्सन ब) होर्न्ले क) ग्रिम ड) सुनीतीकुमार चटर्जी

७. पुढीलपैकी कोणते उदाहरण सदृस्वनलोपाची प्रक्रिया दर्शवते ?

अ) धर्म-धम्म ब) धधाति-दधाति क) तिलक-टिकली ड) सुकेकेळे- सुकेळे

८. 'घरगुती' या शब्दातील गुती हे रूप रूपिमाचा कोणता प्रकार दर्शवते?

अ) मुक्त रूपिम ब) बद्ध रूपिम क) अनन्यसाधारण रुपिम ड) मीलन रूपिम

९. विशिष्ट स्वनिमिक परिस्थितीत स्वनिमाचा लोप होणे म्हणजे काय ?

अ) आंशिक विलोपन ब) आंशिक विलयन क) भेदन ड) संयोजन

[ TURN OVER

१०.मृग-हरीण,पंकज-कमळ ही उदाहरणे अर्थपरिवर्तनाची कोणती प्रक्रिया दर्शवतात ?
अ) अर्थविस्तार ब) ग्राम्यता परिहार क) अर्थच्युती ड) अर्थसंकोच
११. मम्मटाने सांगितलेली काव्यप्रयोजने कोणती?
अ) सौंदर्य ब) यश व कीर्ती क) आनंद व बोध ड) पलायन व रंजन
१२ 'स्वायत्त सौंदर्य' व 'परायत्त सौंदर्य' या संकल्पना मांडणारा पाश्चात्य तत्वज्ञ कोण?
अ) क्रोचे ब) बोमगार्टन क) कांट ड) सॉक्रेटीस
१३. काव्यानंदासंदर्भात 'सविकल्प समाधी' ही संज्ञा कोणत्या समीक्षकाने मांडली आहे?
अ) द.के.केळकर ब) न.चिं.केळकर क) रा.श्री.जोग ड) बा.सी.मर्ढेकर
१४. साहित्यप्रकारांसंदर्भात 'पायाभूत करारां'ची संकल्पना कोणत्या पाश्चात्य साहित्यशास्त्रज्ञाने मांडली आहे?
अ) नॉर्थोप फ्राय ब) टी.एस्.इलियट क) जोनाथन कलर ड) सुझान लँगर
१५.प्रतिभेसंबंधी विज्ञानाच्या आधारे मांडणी कोणत्या मराठी समीक्षकाने केली ?
अ) श्री.के क्षिरसागर ब) रा.शं वाळिंबे क) प्रभाकर पाध्ये ड) माधव आचवल
१६.रसाच्या संदर्भात अनुमितीची कल्पना कोणत्या भारतीय साहित्यशास्त्रज्ञाने मांडली ?
अ) भरत ब) अभिनवगुप्त क) शंकुक ड) दंडी
१७.साहित्यातील औचित्याला असलेले महत्त्व कोणी निर्देशित केले आहे?
अ) वामन ब) कुंतक क) क्षेमेंद्र ड) शंकुक
१८.'सिद्धान्तसूत्रपाठ' व 'दृष्टांतपाठ' हे ग्रंथ कोणी रचले ?
अ) दामोदर पंडित ब) महदाईसा क) केशिराज बास ड) माहिमभट्ट
१९. गीतेवरील सर्वात विस्तृत टीका कोणती ?
अ) भावार्थदीपिका ब) यथार्थदीपिका क) गीतार्थबोधचंद्रिका ड) गीतार्णव
२०. 'आज्ञापत्र'चा कर्ता कोण मानला जातो ?
अ) कवी भूषण ब) मोरोपंत पिंगळे क) नेताजी पालकर ड) रामचंद्रपंत अमात्य
२१. 'वज्राघात' ही कादंबरी कोणी लिहिली?
अ) ना.सी.फडके ब) आनंद यादव क) ह.ना.आपटे ड) ना.ह.आपटे
२२.काकासाहेब खाडिलकरांच्या कोणत्या नाटकावर इंग्रज सरकारने बंदी घातली होती?
अ) एकच प्याला ब) मानापमान क) स्वयंवर ड) कीचकवध
२३.खालीलपैकी कोणत्या नावाने रा.ग.गडकरी यांनी त्यांचे विनोदी लेखन केले आहे ?
अ) गोविंदाग्रज ब) वैनतेय क) बाळकराम ड) चिमणराव

२४. वा.ब.पटवर्धन यांचा कवितेविषयीचा महत्त्वाचा ग्रंथ कोणता?

अ) काव्यशास्त्रप्रदीप ब) कविता आणि प्रतिमा क) काव्य आणि काव्योदय

ड) कविता आणि रसिकता

२५. मराठीतील आद्य नाटककार कोण ?

अ) अण्णासाहेब किर्लोस्कर ब) वि.वा शिरवाडकर क)विष्णुदास भावे ड) राम गणेश गडकरी

२६. 'रूपककथा' ही कोणत्या मराठी कथाकाराची देणगी आहे ?

अ) गंगाधर गाडगीळ ब) अरविंद गोखले क) वि.स.खांडेकर ड) ग.त्र्यं.माडखोलकर

२७. 'उत्खनन' हा काव्यसंग्रह कोणत्या दलित कवीचा आहे?

अ) दया पवार ब) ग्रेस क) यशवंत मनोहर ड) केशव मेश्राम

२८. दलित साहित्याला 'क्रांतिविज्ञान' म्हणणारा लेखक कोण ?

अ) अर्जुन डांगळे ब) नारायण सुर्वे क) बाबुराव बागूल ड) लक्ष्मण माने

२९. दलित साहित्याला कोणत्या आधुनिक महात्म्यांच्या विचारांचा पाया लाभला आहे ?

अ) विवेकानंद व म.गांधी ब) लो.टिळक व स्वा.सावरकर क) राजाराममोहन रॉय

ड) म.फुले व डॉ.आंबेडकर

३०.पुढीलपैकी कोणती लेखिका स्त्रीवादी ठरणार नाही ?

अ) गौरी देशपांडे ब) सानिया क) कुसुम अभ्यंकर ड) कमल देसाई

३१. 'अरे संसार संसार' या कादंबरीला पुढीलपैकी कोणत्या गटात टाकता येईल ?

अ) ग्रामीण ब) दलित क) महानगरी ड) स्त्रीवादी

३२.चिं.त्र्यं खानोलकर यांच्या 'कोंडुरा' या कादंबरीची समीक्षा कोणत्या समीक्षापध्दतीने करणे सयुक्तिक ठरेल ?

अ) समाजशास्त्रीय ब) मार्क्सवादी क) मानसशास्त्रीय ड) स्त्रीवादी

३३. ई.एम्.फॉर्स्टर यांनी कादंबरीतील व्यक्तिरेखा कोणत्या दोन प्रकारच्या असतात असे सांगितले आहे ?

अ) कठोर व नम्र ब) बहुआयामी व सपाट क) विनोदी व करूण ड) विकारी व अविकारी

३४. संवाद हे कोणत्या साहित्यप्रकारात सर्वात महत्त्वाचे ठरतात ?

अ) वैचारीक लेख ब) कविता क) ललितगद्य ड) नाटक

३५.'वात्रटिका'हा काव्यप्रकार मराठीत कोणी आणला ?

अ) आचार्य अत्रे ब) केशवकुमार क) विंदा करंदिकर ड) मंगेश पाडगावकर

३६.खालीलपैकी कोणती कादंबरी दैनंदिनीच्या स्वरूपात आहे ?

अ) अकुलिना ब) सावित्री क) लव्हाळी ड) मुंबई दिनांक

३७. खालीलपैकी कोणत्या लेखकाला ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला नाही ?

अ) विंदा करंदीकर ब) विजय तेंडुलकर क) वि.वा शिरवाडकर ड) वि.स.खांडेकर

३८. महेश एलकुंचवार यांची त्रिनाट्यधारा कोणती ?

अ) कौंतेय-नटसम्राट-विदुषक ब) कस्तूरीमृग-विषवृक्षाची छाया-हिमालयाची सावली

क) वाडा चिरेबंदी-मग्न तळ्याकाठी-युगांत ड) श्रीमंत- कावळ्याची शाळा -गिधाडे

३९. 'स्वयंचलित लेखनतंत्र' हे कोणत्या वादात महत्त्वाचे ठरेल ?

अ) वास्तववाद ब) स्वच्छंदवाद क) अतिवास्तववाद ड) अस्तित्ववाद

४०. समाजवादी विचारांचा प्रभाव पुढीलपैकी कोणत्या मराठी कादंबरीकारावर होता ?

अ) ना.सी.फडके ब) डॉ.केतकर क) साने गुरूजी ड) श्री.ना.पेंडसे

प्रश्न २.खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. ३०

१. षष्ठी विभक्तीच्या वादासंदर्भात चर्चा करा.

२. काव्यकारणांचे स्वरूप विशद करा.

३. आधुनिक मराठी काव्यपरंपरेतील रवीकिरणमंडळाचे कार्य स्पष्ट करा.

४. चांगल्या आत्मचरित्राचे निकष सोदाहरण स्पष्ट करा.

५. समाजशास्त्रीय समीक्षेची ठळक तत्त्वे स्पष्ट करा.

प्रश्न ३.खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. ३०

१. स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय? ते सांगून मराठीतील स्त्रीवादी कथालेखिकांच्या परंपरेचे विवेचन करा.

२. बा.सी.मर्ढेकर यांना नवकवितेचे प्रवर्तक का म्हटले जाते ते सोदाहरण स्पष्ट करा.

३. फुले-आंबेडकरी विचारप्रणालीचा मराठी साहित्यावरील प्रभाव स्पष्ट करा.

४. साहित्यकृतीची समीक्षा करताना विविध समीक्षापध्दती उपयुक्त ठरतात असे तुम्हाला वाटते का ? सकारण लिहा.

*******************